पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 16/12/2019 (सोमवार)
(सायंकाळ)

---

## सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्यांवर कारवाई होणार
## कोटपा कायद्यासंदर्भात नागपूर ग्रामीण पोलिसांची विशेष मोहीम

नागपूर दि. 16 सोमवार, 2019ः
सर्रास होणारे धूम्रपान आणि तंबाखू–खर्रा सेवनाचे वाढते व्यसन आरोग्यास घातक आहे. त्यामुळे तोंडाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. त्यांचे दुष्परिणाम लक्षात घेता नागपूर ग्रामीण पोलिसांनी पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या नेतृत्वाखाली तंबाखू विरोधी कोटपा कायद्यानुसार विशेष कारवाई मोहीम हाती घेतली आहे. सार्वजनिक धूम्रपान आणि शाळा– कॉलेज जवळ तंबाखूजन्य पदार्थांची अवैध विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. संबंध हेल्थ फाऊंडेशन आणि चंद्रपूर कॅन्सर केअर फाऊंडेशनच्या माध्यमातुन प्रशिक्षण आणि कृती कार्यक्रम आखण्यात आला आहे.

सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करून कायद्याचे उल्लघंन करणाऱ्यांवर सिगारेट– तंबाखूजन्य पदार्थ विक्री प्रतिबंध कायदा (कोटपा) अंतर्गत कडक कारवाई करण्यात येते. त्यांचे खास प्रशिक्षण नागपूर जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला तसेच अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत, अनिल जीट्टावार पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली संबंध हेल्थ फाऊंडेशन आणि चंद्रपूर कॅन्सर केअर फाऊंडेशन तर्फे कोटपा कायद्याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तर कर्करोग तज्ञ् डॉ. प्रणव इंगोले यांनी तंबाखूमुळे होणाऱ्या आजाराबत आणि त्याच्या परिणांबाबत उपस्थित पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.

कोट : 50 टक्के कॅन्सर हे केवळ तंबाखू वापरामुळे होतात.
एकूण कॅन्सर रुग्णांपैकी सर्वात जास्त म्हणजे 50 टक्के कॅन्सर हे केवळ तंबाखू वापरामुळे होतात. केवळ 30 टक्केच लोक रुग्णालयात उपचार घेतात. पूर्वी पेक्षा आता आजारी रुग्णांचे वयोमान 20 ते 35 वयोगटात येऊन ठेपले आहे. पैशाची जुळवाजुळव करताना मुलांचे शिक्षण, बायकापोरांची आबाळ होते. अशा रुग्णांवर उपचार करून डॉक्टर ही थकले आहेत. समाजात तंबाखू सेवनावर प्रतिबंध आल्याशिवाय मरणाऱ्यांचे प्रमाण कमी होणार नसल्याचे कर्करोग तज्ञ डॉ. प्रणव इंगोले यांनी सांगितले. कोटपा कायद्याची प्रभावी अमंलबजावणी केल्यास तंबाखूमुळे होणारे कॅन्सरचे प्रमाण कमी करता येईल असे ही ते म्हणाले.
तर तंबाखू–खर्रा सेवनाचे दुष्परिणाम लक्षात घेता जनजागृतीची गरज आहे. शिबीरे, कार्यशाळा, स्पर्धांच्या माध्यमातून मुलांमध्ये त्याच्या दुष्परिणामांबाबत जागृती व्हायला हवी. मात्र, या पुढे या कायद्याचे उल्लंघन केल्यास कोटपा कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी असे आदेशही अपर पोलीस अधीक्षक मोनिका राऊत यांनी उपस्थित पोलिसांना दिले.

कोटपा–2003 कायदा म्हणजे काय ?

सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने प्रतिबंध कायदा अधिनियम 2003 हा केंद्र सरकारचा कायदा आहे. या कायद्यात एकूण पाच प्रमुख कलमे आहेत. त्यापैकी कलम–4 नुसार सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणे गुन्हा आहे. तर कलम– 6 (ब ) नुसार कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या 100 यार्ड आवारात तंबाखूजन्य पदार्थ विक्रीवर प्रतिबंध आहे. तसेच बाल न्याय कायदा कलम–77 नुसार बालकांना किंवा बालकांकडून तंबाखूजन्य पदार्थ विक्री केल्यास 1 लाख रुपये आणि 7 वर्षाची शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. बाल न्याय कायदा कलम 77 नुसार कारवाई  करणारे महाराष्ट्र हे पाहिले राज्य आहे.






पोलीस माहिती कक्ष

नागपूर  जिल्हा (ग्रामीण), नागपूर